म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २३९५

# समर गीते

समर गीते

समर गीते

समर गीते

समर गीते

समर गीते

REFBK-0021835
REFBK-0021835

राष्ट्र सेवा दल प्रकाशन

# समर गीते

काव्य
२५५४३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[क्र. मा. प.]

* राष्ट्र सेवा दल प्रकाशन

* प्रकाशक :
बा. य. परीट
कार्यवाह, राष्ट्र सेवा दल
राष्ट्र सेवा दल मध्यवर्ती कचेरी
साने गुरुजी स्मारक
सिंहगड रस्ता, पर्वती
पुणे, ४११ ०३०

* मुद्रक :
नाना डेंगळे
साधना प्रेस,
४३० शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०

* संकलन : ३

* किंमत २·५०

वि. क्र.
२३९५

२९८३५
संदर्भ
३१७०/८८
८१०४

## प्रकाशकाचे दोन शब्द

समर गीतांची ही तिसरी आवृत्ती आपल्या हाती देताना आनंद होत आहे. उभ्या महाराष्ट्रातूनच नाही तर साऱ्या भारतातून समर गीतांना मागणी आल्याने या आवृत्तीत हिंदी गीतेही या वेळी अधिक घेतली आहेत. श्रध्देय जयप्रकाशजींचे जयगीतही या पुस्तकात दिले आहे.

आशा व खात्री आहे की, याही आवृत्तीची आपणाकडून अधिक प्रमाणात मागणी होईल व युवा पिढीला त्याचा उपयोग होईल.

बा. य. परीट
प्रकाशक

## • जय-गीत

जीवन विफलताओंसे भरा है
सफलतायें जब कभी आयीं निकट
दूर ठेला है उन्हें निज मार्गसे
तो क्या वह मूर्खता थी ?...नहीं !
सफलता और विफलताकी
परिभाषायें भिन्न हैं मेरी
मुझ क्रांति शोधकके लिये
कुछ अन्यही पथ मान्य थे, उद्दिष्ट थे ।
पथ त्यागके, सेवाके, निर्माणके
पथ संघर्षके, संपूर्ण क्रांतिके
जग जिसे कहता विफलता
थी शोधकी वे मंजिलें
मंजिलें वे अनगिनत हैं
गन्तव्य भी अति दूर है
रुकना नहीं मुझको कहीं
अवरुद्ध जितना मार्ग हो
निज कामना कुछ है नहीं
सब है समर्पित ईशको तो
विफलताओंपर तुष्ट हूँ अपनी
और यह विफल जीवन
शत शत धन्य होगा यदि
समानधर्मा प्रिय तरुणोंका
कंटकाकीर्ण मार्ग यह
कुछ सुगम बन जाये

# अनुक्रम


| नाव | पान |
|---|---|
| सदैव सैनिका–मराठी | १ |
| सदैव सैनिकों–हिंदी | ३ |
| जय भारतवर्ष महान–मराठी | ४ |
| जय भारतवर्ष महान–हिंदी | ५ |
| आज तुझ्यासाठी भारता | ६ |
| स्वातंत्र्याचा जयजयकार | ७ |
| नवा इतिहास पुन्हा घडवू | ८ |
| या गनिमाला | १० |
| राहतील मागे का भारतीय नारी | १२ |
| वीर उतरले हो | १३ |
| पहिला मुजरा | १४ |
| भारतभूमी तुला नमो मी | १७ |
| या गरिबानुं या | १८ |
| घाल शिपाई घाव | १९ |
| देवाचे मजूर | २० |
| स्वातंत्र्याचे आम्ही शिपाई | २१ |
| तांडव | २२ |
| बलसागर भारत होवो | २४ |
| ढोल वाजवा ढोल | २५ |
| उठू दे देश–पेटू दे देश | २६ |
| निर्धार | २७ |
| प्यारा हिंदुस्थान | २९ |
| शिंग फुंकले रणी | ३० |
| चला उगवतीकडे | ३१ |
| शपथ | ३२ |

करा आनंदीआनंद ३३
जय स्वतंत्रता जय जनसत्ता ३४
उचल तुझी तलवार ३५
जयतु जयतु भरत भूमि ३६
झेंडा स्वर्गावर चढवा ३७
बलिदान ३८
सिंहगर्जना ४०
लाल चिन्यांनो खबरदार ४२
सैनिक माझे नाव ४३
जिंकू किंवा मरू ४४
लढा वीर हो लढा ४५
भारत सेना विजयी असो ४६
जय जय रणचंडी, जय जय भारत ४७
मराठ्यांचे संचलनगीत ४८
आवाहन ४९
उठो इन्सान ५०
दिप तू जलाता चल ५१
जागा धरतीका भगवान ५१
गलत मत कदम उठाओ ५२
युग की जड़ता के खिलाफ ५४
क्रांती है पुकारती ५५
क्रांती के सिपाही चले ५६
जाग उठी तरुणाई है ५७
करवटें बदल रहा है आज सब जहाँ ५८
मानव तितुका ५९
* जय-गीत

## सदैव सैनिका

सदैव सैनिका पुढेच जायचे
न मागुती तुवा कधी फिरायचे ॥ ध्रु०॥

सदा तुझ्यापुढे उभी असे निशा
सदैव काजळी दिसायच्या दिशा
मधून मेघ हे नभास ग्रासती
मधेच या विजा भयाण हासती
दहा दिशांतुनी तुफान व्हायचे
सदैव सैनिका पुढेच जायचे ॥ १ ॥

प्रलोभने तुला न लोभ दाविती
न मोहबंधने पदास बांधती
विरोध क्रोध वा तुला न थांबवी
न मोह भासतो गजान्त वैभवी
न दैन्यही तुझे कधी सरायचे
सदैव सैनिका पुढेच जायचे ॥ २ ॥

वसंत वा शरद् तुला न ती क्षिती
नभात सूर्य वा असो निशापती
विदीर्ण वस्त्र हो मलीन पावले
तरी न पाय हे कधी विसावले
न लोचना तुला सुखे मिटायचे
सदैव सैनिका पुढेच जायचे ॥ ३ ॥

नभात सैनिका प्रभात येऊ दे
खगांसवे जगा सुखात गाऊ दे
फुला फुलावरी सुवर्ण शोभु दे
जगास शांतता सुहास्य लाभु दे
न पाय तोवरी तुझे ठरायचे
सदैव सैनिका पुढेच जायचे ॥ ४ ॥

– वसंत बापट

# सदैव सैनिकों

सदैव सैनिकों चलो बढें चलो
हटो न तुम कभी चलो उठे चलो ॥ ध्रु० ॥

सदैव राहमें रहे खड़ी निशा
घनान्धकार से रहे ढकी दिशा
कभिन्न बदलियाँ दिगन्त ग्रास दे
दुरन्त बिजलियाँ कराल हास्य दे
घहर चले हवा कुचल मचल चलो ॥ १ ॥

प्रलोभ लालसा न ताप दें कभी
विमोह–रश्मियाँ तुम्हें न मोह लें
विपत्ति हो सदा गिनो न, बढ़े चलो ॥ २ ॥

वसंत या शरद् समान गिन लिए
तमिस्र या तपन समान सह लिए
फटे वसन गहे छिले चरण सहे
न पर विपत्ति में कभी रुके रहे
न कष्ट से डरो न चैन सोच लो ॥ ३ ॥

प्रभात हँस उठे सुवर्ण राग में
जगत् चहक उठे नितान्त सौख्य में
प्रसून खिल उठे सुवर्ण रंग में
सहर्ष शान्ति हो समस्त विश्व में
न तब तलक रुको न या कि साँस लो ॥ ४ ॥

– कवी : श्री वसंत बापट, रूपांतर : श्री पेठे

# जय भारत वर्ष महान !

जय हिंद हिंद आनंद भुवन जय भारत वर्ष महान ॥ ध्रु० ॥

हा रजतशिखरधर गिरिवर सुंदर उत्तरेस हिमवान
हे नीलगगनगत चक्र सुदर्शन तळपत वरि भास्वान
हे चंद्रचलित जल उर्मिल सागर मन्द्र गाति जयगान

हा वंग रंगला कलापुजनी गुर्जर मृदु उद्गार
रजपूत, शीख, रणधीर मराठा वीर धरी तलवार
काश्मीर रम्य सीमान्त काम्य गोमान्त स्वर्ग सोपान

व्हा मुदित उदित हा उदयगिरिवर रवि उजळित अस्मान
हा अधरि मधुर नवगीत आळवित पूर्वेचा पवमान
खरा हर्षभरित जग पुण्य करीत नित उधळतात मधुगान

जे हीन पतित जे दीन दलित त्या आश्वासन विश्वास
हा हरित हरित भूखण्ड साठविल अखंड मनि विश्वास
मग मरणकिरण जरि अणुतुन आले देऊ तया आव्हान

हे एक ईश दो सूर्य चंद्र हे तीन लोक साधार
या चार वेद तुम्हि पंचभूतगण सहा ऋतु साकार
या सप्तसिंधुनो, आठ दिशांनो, गा नव मानवगान

— वसंत बापट

# जय भारतवर्ष महान

जय हिंद हिंद आनंद भुवन जय भारतवर्ष महान ॥ धृ० ॥

यह रजत शिखरधर गिरिवर सुंदर उत्तर को हिमवान
यह नीलगगनगत चक्र सुदर्शन ऊपर है भास्वान
यह चंद्र चलित जल उर्मिल सागर मन्द्र गाये जयगान ॥ १ ॥

यह वंग रंगा है कला पुजा में गुर्जर मृदु उद्‌गार
रजपूत सिक्ख रणधीर मराठा वीर धरे तलवार
काश्मीर रम्य सीमान्त दक्षिण प्रान्त स्वर्ग सोपान ॥ २ ॥

यह मुदित उदित रवि उदयगिरी पर उज्ज्वल सा अस्मान
यह अधरोंमें मधुराग आलापे पूरब का पवमान
खग हर्षभरित जग पुण्य करत नित बरसाते मधुगान ॥ ३ ॥

जो हीन पतित जो दिन दलित जिन आश्वासन विश्वास
यह हरित हरित भूखण्ड जुटाये अखण्ड जन विश्वास
तब मरण किरण यदि आये अणुसे दे देंगे आव्हान ॥ ४ ॥

यह एक ईश दो सूर्य चन्द्र ये तीन लोक साधार
ये चार वेद तुम पंचभूत गण षड्‌ऋतु भी साकार
ओ सप्त सिंधु और अष्टदिशाओंका नव मानव गान ॥ ५ ॥

— वसंत बापट

## आज तुझ्यासाठी भारता

गोड गोड गीत घुमे युवतीच्या ओठी
आज तुझ्यासाठी भारता ।।
धुंद फुंद शीळ घुमे युवकांच्या ओठी
आज तुझ्यासाठी भारता ।।
लाभला स्वराज्य तिलक भरतभूमि भाला
शतकाचा एक चरण आज पुरा झाला
आनंदा पूर येत पापणीच्या काठी
आज तुझ्यासाठी भारता ।। १ ।।

प्राणांचे दान दिले याद येत त्यांची
धन्य धन्य बंदिवास भोगला तयांची
आमच्या मनामनात भावगंध दाटी
आज तुझ्यासाठी भारता ।। २ ।।

या स्वतंत्र भारतास रूप दिले ज्यांनी
खूप धन्यवाद त्यांस देऊ आसवांनी
जन्म जन्म राहतात या अतूट गाठी
आज तुझ्यासाठी भारता ।। ३ ।।

आव्हाने तर असंख्य वर्तमान देतो
साद घालतो भविष्यनाद ऐकु येतो
ध्येयाचे लेख नवे रेखले ललाटी
आज तुझ्यासाठी भारता ।। ४ ।।

झुलत डुलत आनंदे गात नव्या रागा
फुलत फुलत नौजवान फुलवतील बागा
कर्तृकीचे हे सलाम ताठ साठ कोटी
आज तुझ्यासाठी भारता ।। ५ ।।

– वसंत बापट

# स्वातंत्र्याचा जयजयकार

त्रिवार त्रिवार त्रिवार
स्वातंत्र्याचा जयजयकार ऐका अमुचा हा ललकार
स्वातंत्र्याचे रक्षण करण्या प्राणपणे लढणार ॥ ध्रृ० ॥

स्वातंत्र्याचे वारे आता संचारले अंगात
जुन्यापुराण्या रूढी आता विसरा ह्या देशात
हाच मनात विचार
कुणी कुणाहुन मोठा नाही, कुणी कुणाहुन छोटा नाही
समान सारे भाई भाई हा अमुचा निर्धार ॥ १ ॥

जाती-पाती ह्यांच्या भिंती आता कोसळणार
हिंदी तितुका एकच आहे हेच खरे ठरणार
संघटना करणार, एकजूट करणार
कसणाराला धरणी देऊ, श्रमणाराला गिरणी देऊ
फिरूनी मिळवू सारे भाऊ वैभव अपरंपार ॥ २ ॥

– वसंत बापट

# नवा इतिहास पुन्हा घडवू

उत्तुंग आमुची उत्तर सीमा इंच इंच लढवू
अभिमान धरू, बलिदान करू, ध्वज उंच उंच चढवू ॥ ध्रु. ॥

परक्यांचा येता हल्ला
प्रत्येक घर बने किल्ला
हे कोटी कोटी भुजदंड
होतील इथे ध्वजदंड
छातीची करूनी ढाल, लाल या संगिनीस भिडवू ॥ १ ॥

बलवंत उभा हिमवंत
करि हैवानांचा अंत
हा धवलगिरी हा नंगा
हा त्रिशूळ कांचनगंगा
जरी झुंड पुंड शत्रूंची आली, खिंड खिंड अडवू ॥ २ ॥

जरी हजार अमुच्या जाती
संकटामधे विरघळती
परचक्र येतसे जेव्हा
चौदांची एकच जिव्हा
मग पक्ष पंथ जरि लक्ष आमुचे सागरात बुडवू ॥ ३ ॥

राष्ट्राचा दृढ निर्धार
करू प्राणपणे प्रतिकार
ह्या नसानसांतिल रक्त

जाळीत आसुरी तख्त
आम्ही न कुणाचे दास नवा इतिहास पुन्हा घडवू ॥ ४ ॥

अन्याय घडो शेजारी
की दुनियेच्या बाजारी
धावून तिथेही जाऊ
स्वातंत्र्य-मंत्र हा गाऊ
स्वातंत्र्य, बंधुता, समता यांचा घोष सदा घुमवू ॥ ५ ॥

– वसंत बापट

## " या गनिमाला "

या गनिमाला नाही कळला अजून हिंदुस्थान
दिसला त्याला तपी बैसला दुरून गिरी हिमवान
गंगेच्या अंगावर दिसला झुलता हिरवा साज
यमुनातिरी संगमरवरी चंद्रमण्यांचा ताज
पंचनद्यांची अक्षय थाळी बहार झेलमवरचे
गगन-मांडवा खांब रोविले माड दक्षिणेघरचे
परी न दिसले त्याला इथले जिते लोह पाषाण
या गनिमाला...

चहामळयांचा तेलमळयांचा वास हुंगिला कोठे
ओल्या हिरव्या गहुलोंब्यांच्या श्वासाचे सुख मोठे
असेल त्याला फुलबागांची चाहुल आली मंद
चंदनचर्चित मूर्तीचा वा असेल आला गंध
तया न झाले जगदंबेच्या धूपाचें परि भान
या गनिमाला...

लाटावरल्या वाटा चुकले नावाडयांचे गीत
त्यांत तयाला असेल कळली कंथाघरचीं प्रीत
मंजुळ मुरली नभात भरली असेल पडली कानी
तये ऐकली विव्हळ वीणा घायल कोमलवाणी
नसे ऐकले त्याने इथले हरहर भैरवगान
या गनिमाला...

वाऱ्यावरती वहात गेला अंगाईचा स्पर्श
मतिमंदाला अंदाजाने कळे गुलाबी हर्ष

मदन तरूवर फुलवित मोहर पवन चले पुरवैय्या
दक्षिण दर्या इथे अंथरी रेतीची सुखशैय्या
झुंझाराच्या भुजांत लपले कळे न त्यास तुफान
या गनिमाला...

शेतमळचांतील दिसले असतिल किसान त्या कष्टाळू
असती दिसल्या जात्यावरल्या दळणाऱ्या कुणी साळू
घामाने भिजल्या सावल्या गिरण्यांतुन खपताना
मापुन मोजुन जरा वाकल्या मेजावरल्या माना
परि सर्वांच्या नसानसांतुन धगधगतो अभिमान
या गनिमाला...

जाट-शीख-रजपूत कुळांची उगा न जगतीं ख्याती
कळिकाळाला कळली आहे मर्द मराठी छाती
काय घेतले तृण कापाया विळे कोयते हाती
भाला बरची पिकवी घरची कृष्णातिरीची माती
विळे कोयते करतिल येथे शत्रूचे शिरकाण
या गनिमाला...

– वसंत बापट

## राहतील मागे का भारतीय नारी

कोटि कोटि वीर पुरुष समरवेषधारी
राहतील मागे का भारतीय नारी
समय बिकट येता
एक हा विचार
मानसात दिवसरात एक हा विचार
समर निकट येता
कोटी कोटी वीर पुरुष समरवेषधारी
राहतील मागे का भारतीय नारी ॥ १ ॥

जाहले स्वराज्य-समर । हसत हसत कसुनि कमर
शूर युवति शत्रुपुढति समरि ठाकल्या
प्राण–आहुती रणात सहज टाकल्या
समर निकट येता ॥ २ ॥

ही परंपरा अजून । ठेवली असे जपून
अजय अभय, युवक युवति, लढति भारती
देव देवता तयास गाति आरती
समर निकट येता ॥ ३ ॥

येऊदे रणात चीन । आम्हिही मुळी न दीन
भारतीय युवक युवति भय न जाणती
अमर समर गीत गात विजय आणती
समर निकट येता ॥ ४ ॥

उंच उंच अंबरात । तीन रंग लहरतात
दिव्य ते अशोक चक्र तळपते पहा
सांगण्यास दुष्मनास " दूर तू रहा "
समर निकट येता ॥ ५ ॥

– वसंत बापट

# वीर उतरले हो

वीर उतरलें हो, उतरले हो, उतरले रणमैदानी वीर उतरले हो ।
आमची नवी नीती, आमची नवी रीती, आम्ही सोडली भीती
घेतलं निशाण हातीं या मर्दांनी ।। ध्रु. ।।

पहा देशाची झाली कशी दैना
यांना हालवेना यांना चालवेना
यांना मनांतली बात कुठे बोलवेना
आमची नवी पिढी, उंच धरली गुढी, सारी सरली अढी
संकटावर कडी केली मर्दांनी ।। १ ।।

आमचा शूरांचा देश, आमचा वीरांचा देश
आमचा नवा संदेश, आमचा नवा आदेश
हातीं घेऊन कुदळ, श्रमसेनेचं दळ, अंगी संचारलं बळ
अहो जादुची कळ केली मर्दांनी ।। २ ।।

# पहिला मुजरा

हिंदभूमिचे नंदनवन अतिसुंदर ते काश्मीर
तिथे हिंदचे वैऱ्यासंगे रणकंदन गंभीर
स्वातंत्र्याचे रक्षण करण्या झुंजति रणझुंजार
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ॥ ध्रु. ॥

स्वातंत्र्यावर घालायला घाला
अंधारातून घाव अचानक आला
तो छातीवर आपुल्या झेलायाला
हासत हासत सज्ज जाहले काश्मीरातील वीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ॥ १ ॥

नुकती कुठली होती तुटली भवतीची जंजीर
तो मानेवर उन्मत्तांचा ये कपटी खंजीर
जिंकुनि घेण्या स्वातंत्र्याचा किल्ला
पाकिस्तानी फौजा करिती हल्ला
भारतीयांच्या अभिमानावर घाला
चला जान कुर्बान कराया घ्या तळहाती शीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ॥ २ ॥

पाकिस्तानी फौजा कसल्या ! क्रूर लुटारू चोर
लुट लुटोनी जाळत पोळत सुटले ते घरदार
ठार करावे किती हजारो लोक
आगीमध्ये फेकति बाळे कैक
विटंबिती ते माता भगिनी अनेक

ऐकुनि सारे संतापाने तुटते शीर नि शीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ॥ ३ ॥

दिल्लीमध्ये वीर जवाहर भारतभूचा हीर
ऐकुनि वार्ता गेला खवळुन होता तो रणधीर
पाकिस्तानी डोळ्यावरची धुंदी
उतरायाला जाई सेना हिंदी
जाति विमानामधुनी स्वार शिबंदी
तोफेला मग भिडल्या तोफा समशेरिस समशेर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ॥ ४ ॥

चपळाईने चालति सेना जसे धनूतुन तीर
बिजलीपरि झळकून लकाकत व्यापिती झेलमतीर
शौर्याने किती लढती हिंदी सेना
शत्रुची किती केली त्यांनी दैना
पळत निघाले परतुन पाकिस्ताना
तोबा तोबा करुनि पळाले पाकिस्तानी पीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ॥ ५ ॥

काश्मिरी जनतेची प्रीती देशावर खंबीर
एक दिलाने धावुन आले सारे रंक अमीर
हिंदू-मुस्लिम सारे भेद निमाले
हिंदी सेनेमधुनी सामिल झाले
सर्व तिरंगी झेंड्याखाली आले
काश्मीरातिल जनतेचा मग वाढत जाई धीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ॥ ६ ॥

ब्रिगेडिअर उस्मान आपुला सेनानायक थोर
हाय अचानक गोळा लागुनि रणांगणी हो ठार
मातृभूमिशी राखुनि पूर्ण इमान
धन्य होसि तू वीरमणी उस्मान
तव कीर्तीने दुमदुमते अस्मान
गातिल कीर्ती झेलम, रावी गातिल गीत समीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ।। ७ ।।

ऐकुनि तेथिल करुण कहाण्या येते नयनी नीर
त्यागाची परि कमाल पाहुनि उन्नत होते शीर
शेरवाणि तर मेला शेरावाणी
अक्षय त्याची राहिल वीर-कहाणी
शेरवाणिच्या बलिदानाची गाणी
दिशादिशातुनि अभिमानाने गातिल शत शाहीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ।। ८ ।।

धन्य धन्य ते वीर जाहले धन्य धन्य काश्मीर
तुमच्या ऐसे वीर निपजता विजया काय उशीर
स्वातंत्र्याचे खरेखुरे तुम्ही भक्त
स्वातंत्र्यास्तव तुम्ही सांडले रक्त
तुमच्या त्यागे स्थिर हो हिंदी तख्त
नवे उदेले राष्ट्र हिंदवी झुकवित चरणी शीर
पहिला मुजरा घे मानाचा मानकरी काश्मीर ।। ९ ।।

– वसंत बापट

# भारतभूमी तुला नमी मी

भारतभूमी, तुला नमी मी तुझा विनम्र कुमार
भारतमाते, सदैव माते असो तुझा आधार
एक तूची असशी साची मजला जीवाधार
भारतभूमी, तुला नमी मी तुझा विनम्र कुमार ॥ ध्रु. ॥

आई अंकावरती तूझ्या आजवरी बागडलो
कर्तव्याच्या पूर्तिसाठी नाही गे धडपडलो
अनुतापाने जळते आता अंतर हे शतवार
नयनांमधुनी झरझर झरते अश्रुजलाची धार ॥ १ ॥

अश्रुफुलांची माला केवळ देइल कैशी शक्ती
शक्तीसाठी अमुच्या हृदयी अपार भारत भक्ती
चाळीस कोटी बाळे होऊ कोटचवधी अंगार
जीवज्योती जळत्या ठेवू, नष्ट करू अंधार ॥ २ ॥

पाऊल पडता तालावरती, हृदया हृदय जुळाले
या हृदयांच्या जुळणीमधुनी आम्हा धैर्य मिळाले
एक दिलाचे वीर दलाचे जातील कोणा हार
कोण आमुचा तुफान संगर यापुढती सहणार ॥ ३ ॥

– वसंत बापट

## या गरिबानुं या

या ऽ गरिबानु या, झेंडा हाती घ्या, शाहिरी हाक तुम्हा हाय हो
सावकारशाही ठेवायची नाही, ठेचायची आता हाय हो ॥ ध्रु. ॥

मजल्यावर मजले, डौलानं सजले, नजर ठरत नाय हो
झापांची झोपडी, अंधारी बापडी, रंकाच्या नशिबी हाय हो ॥१॥

मोटार जांभळी, भरधाव धावली, बसुन भावली जाय हो
रानांतल्या वाटे, तुडवून काटे, रंकाचे फाटले पाय हो ॥ २ ॥

आला उन्हाळा, पडद्यास्नी वाळा, झळीचं नाव कुठं नाय हो
रंकाला मात्र, बाभळीची छत्रं, संगतीला कुत्रं हाय हो ॥ ३ ॥

हुक्क्यावर फुंकर, घालायला नोकर, थंडीत लोकर हाय हो
रंकाला मात्तर, नेसायला लक्तर, झोपायला फत्तर हाय हो ॥ ४ ॥

बगीचा फुलला, रंगानं खुलला, वाऱ्यानं झुलला हाय हो
खडक फोडुन, जंगल तोडुन, कंबर मोडुन जाय हो ॥ ५ ॥

चांदीच्या ताटात, जेवायचं थाटात मिठाई पोटात जाय हो
मातीची मडकी, जवार किडकी, रंकाला सण कधी नाय हो ॥ ६ ॥

क्रांतीचा झेंडा, पुकारि बंडा, शाहीरी हाक तुम्हा हाय हो
अन्याव मिटवा, जुलूम हटवा, मोलाची घटका जाय हो ॥ ७ ॥

# घाल शिपाई घाव

मुखि अल्लाचे नाव, अंतरी सैतानाचा भाव
दया कशाची याला, यावर घाल शिपाई घाव ॥ ध्रु. ॥

अत्याचारी हत्यार घेऊन टपून हा बसला
अंधारातच लूट कराया घरामध्ये घुसला
शूर घरधनी सावध म्हणुनी बेत पुरा फसला
चोर किती शिरजोर, आणती वर सावाचा आव
दया कशाची याला, यावर घाल शिपाई घाव ॥ १ ॥

आग ओकण्या जरी विमाने शंभर याची आली
अचूक बसता घाव जिव्हारी कोसळतिल ती खाली
खुनी खंजिरा याचा उत्तर खड्ग तुझे जयशाली
चूड हिसकुनी त्याच्या करिची घरास त्याच्या लाव
दया कशाची याला, यावर घाल शिपाई घाव ॥ २ ॥

राख राख आईची इज्जत, विचार इथे कसला
दूध पिउनि हा साप उलटला ठेच जिथे हा दिसला
तू धैर्याचा पुतळा केवळ शौर्याने रसरसला
जयजय भारतमाता, वीरा घे देशाचे नाव
दया कशाची याला, यावर घाल शिपाई घाव ॥ ३ ॥

— वसंत बापट

# देवाचे मजूर

देवाचे मजूर, आम्ही देशाचे मजूर, कष्ट करू भरपूर ।।

बाहेरील ही शेती करून, धनधान्याने तिला नटवून
फळाफुलांनी तिला हसवून, दुष्काळा करू दूर ।।

हृदयातिल ही शेती करून, स्नेहृदयेचे मळे पिकवून
समानता प्रेमाला निर्मुन, सौख्या आणू पूर ।।

रोगराई ती करूनि दूर, घाण सकळही करूनि दूर
स्वर्ग निर्मु या भरतभूमिवर, बदलू सारा नूर ।।

दिवसभर असे कष्ट करून, जाऊ घामाघुम होऊन
रात्री भजनी जाऊ रंगुन, भक्तीचा धरू सूर ।।

कर्मामध्ये दिव्यानंद, सेवेमध्ये दिव्यानंद
नाही अन्य कशाचा छंद, नाही काही जरूर ।।

– साने गुरुजी

# स्वातंत्र्याचे आम्ही शिपाई

स्वातंत्र्याचे आम्ही शिपाई, सुखवू प्रियतम भारतमाई ॥

देशभक्तिचा सुदिव्य सोम, पिउनि करू प्राणांचा होम,
कष्ट-हाल हे अमुचे भाई, सुखवू प्रियतम भारतमाई ॥

धैर्याची ती अभंग ढाल, त्यागाची ती वस्त्रे लाल ॥
निश्चयदंडा करात राही, सुखवू प्रियतम भारतमाई ॥

समानतेची स्वतंत्रतेची, पताकेवरी चिन्हे साची
दिव्य पताका फडकत जाई, सुखवू प्रियतम भारतमाई ॥

विरोध आम्हा करील कोण, करू सर्वांची दाणादाण
जोर आमुचा कुणी न साही, सुखवू प्रियतम भारतमाई ॥

परकी अथवा स्वकीय झाला, जुलूम आम्हा असह्य झाला ॥
जुलूम जाळू ठायी ठायी, सुखवू प्रियतम भारतमाई ॥

जाच-काच गरिबांना नुरवू, झोपडयांतूनही मोदा फुलवू
मुक्त तयांना करू लवलाही, सुखवू प्रियतम भारतमाई ॥

– साने गुरुजी

# तांडव

रुद्र नाचतो कैलासावर घुमतो तांडवडंका
उंच उसळल्या काळसागरी डगमग करिते लंका ।। ध्रु० ।।

पिंग जटांच्या विजाळ गगनी चंद्र खातसे झोले
पवित्र घेता युद्धपवित्रा धरणी चरणीं डोले
विकट हासती कंठी कवट्या, ओकती नाग विषार
गर्र खातसे गिरकी गंगा उडवित अग्नितुषार
उठा उठा रे अवघे जन गण मनात कसली शंका
रुद्र नाचतो कैलासावर घुमतो तांडवडंका ।। १ ।।

रुद्राच्या रणयज्ञामाजी या रे दीक्षा घ्याया
विश्वामधले असुर मातले असुध त्यांचे प्याया ।
पंचप्राणही अपुरे पडतिल तिथे न फेका नाणे
सर्वस्वाचा होम हवा रे नकोत मूठभर दाणे
भाळावरती लावून या तर निजरुधिराच्या पंका
रुद्र नाचतो कैलासावर घुमतो तांडवडंका ।। २ ।।

दिले जयाला अभयासाठी शिवमंगल वरदान
तोच उलटुनी पडला तुटुनी लुटुनी घ्याया प्राण
रुद्र शुभंकर हो प्रलयंकर काळ बने दैत्यांचा
या रे जन गण रुद्रासंगे अवघे थयथय नाचा
त्रिभुवन झाले आज रणांगण ऐका भैरवशंखा
रुद्र नाचतो कैलासावर घुमतो तांडवडंका ।। ३ ।।

तांडव भुवनी, तांडव गगनी, तांडव अगणित चित्ती।
पार उडाली मोहननिद्रा जागृत हो चित्‌शक्ती
पर्वत ढळले उंच उसळले खवळुन शौर्य समुद्र
वीरभद्र भिरकावून उठले प्रपंच पोथी क्षुद्र
वीर निघाले क्षाळायाला अवघ्या विश्वकलंका
रूद्र नाचतो कैलासावर घुमतो तांडवडंका ॥ ४ ॥

'देवदारूघनजटामंडिता'! हिमवत्.चंद्रा! रूद्रा!
नदनिर्झर-सर्पांकित! शंकर, भयहर शक्तिसमुद्रा
सह्य-असह्यशुलधर! सुंदरविंध्य-गजाजिनधारी!
अद्वितीय तव नेत्र उघडुनि, दानवगण संहारी'
दिव्य मंत्र हा जपुनी चला रे कळिकाळाला जिंका
रूद्र नाचतो कैलासावर घुमतो तांडवडंका ॥ ५ ॥

— वसंत बापट

# बलसागर भारत होवो

बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनि राहो ।।

हे कंकण करि बांधियले, जनसेवे जीवन दिधले
राष्ट्रार्थ प्राण हे उरले, मी सिद्ध मरायला हो ।।

वैभवी देश चढवीन, सर्वस्व त्यास अर्पीन
तिमिर घोर संहारीन, या बंधु सहाय्याला हो ।।

हातांत हात घेऊन, हृदयास हृदय जोडून
ऐक्याचा मंत्र जपुन, या कार्य करायाला हो ।।

करि दिव्य पताका घेऊ, प्रिय भारत-गीते गाऊ
विश्वात पराक्रम दावू, ही माय निजपदा लाहो ।।

या उठा करू हो शर्थ, संपादु पुरुषार्थ
हे जीवन ना तरि व्यर्थ, भाग्य सूर्य तळपत राहो ।।

ही माय थोर होईल, वैभवे दिव्य शोभेल
जगतास शांती देईल, तो सोन्याचा दिन येवो ।।

— साने गुरुजी

# ढोल वाजवा ढोल

ढोल वाजवा ढोल, ढोल वाजवा ढोल ।
सुखाची दुनिया समद्यास्नी येऊ द्या, रगात सांडू मोल ।।

क्रांतीचा बावटा हाती घेऊन्‌शान्‌
शेतकरी चालला लढाईला
वखत कठीन हाय जिवाचं भ्या नाय
म्होरं निघालं आघाडीला
शेतकरी बावटा नाचत येऊ द्या, रगात सांडू मोल ।।

कलियुग आलं, इमान गेलं,
गरिबाचं कैवारी कुणी नाय उरलं
गरिबाच्या माना चराचरा कापून
सोन्याचं हंडं घरात भरलं
हरामी कायदा उधळून द्याया, रगात सांडू मोल ।।

दुनियेत यायचा शेतकरी कायदा
जुल्माचा राजा फेकुन द्यायचा
तवा जयप्रकाशनं केलाया वायदा
शेतकरी कामकरी सौराज्य द्यायचा
क्रांतीचा बावटा मस्तीत येऊ द्या रगात सांडू मोल ।।

क्रांतीचा झेंडा फत्ते होणार
दुनियेत समद्या गाजत फिरणार
सारं जगत त्याला सलाम करणार
दुनियेचा शाहीर पवाडे गाणार
पूर्ण क्रान्तीचा जयजय बोला रगात सांडू मोल ।।

## उठू दे देश....पेटू दे देश

उठू दे देश...पेटू दे देश ॥ धृ० ॥
येथून तेथून सारा पेटू दे देश

कोटी कोटी आता उठू दे किसान
निर्भयपणे अपुली उंच करो मान
मुक्तकंठे गाऊ स्वातंत्र्याचे गान
नष्ट करू आता सारे अपुले क्लेश ॥ १ ॥

कमावता तुम्ही गमावता कसे
सिंह असुनी तुम्ही बनलात रे ससे
तेजे उठा आता बसा ना असे
माणसे बना आता बनू नका मेष ॥ २ ॥

रात्रंदिवस तुम्ही करीतसा काम
जीवनात तुमच्या उरला नाही राम
घाम गळे तुमचा हरामाला दाम
येवो तुम्हा लागा थोडा तरी त्वेष ॥ ३ ॥

मोर्चे काढा आता निघू द्या फौजा
लुटारूंच्या आता थांबवु या मौजा
चालू देणार नाही कोणाच्या गमजा
कोटी किसानांचा फणा करी शेष ॥ ४ ॥

# निर्धार

समरभूमिचे सनदी मालक शतयुद्धांचे मानकरी
रणनवऱ्यांची जात आमुची, कोण आम्हां भयभीत करी ।। धृ० ।।

घोरपडीला दोर बांधुनि पहाड दुर्घट चढलेले
तुटून पडता मस्तक खाली धुंद धडाने लढलेले
खंदकांतल्या अंगारावर हासत खेळत पडलेले
बाप असे कळिकाळ आमुचे, कीर्त गाजली दिगंतरी
रणनवऱ्यांची जात आमुची, कोण आम्हां भयभीत करी ।। १ ।।

या मातीने दिला वारसा कठोर छाती दगडाची
दिली नद्यांनी ध्येयासाठी समर्थता बलिदानाची
पहाड डोंगर इथे सांगती अजिक्यता अभिमानाची
जगदंबेचा पालव येथे लढवय्यांच्या सदा शिरी
रणनवऱ्यांची जात आमुची कोण आम्हां भयभीत करी ।। २ ।।

करवत कानस कुणी चालवो, पिकवो कुणी शेतमळा
कलम कागदावरी राबवो, धरो कुणी हांतात तुळा
करात कंकण असो कुणाच्या वा भाळावर गंधटिळा
शिंग मनोऱ्यावरी वाजता उभी छावणी घरोघरी
रणनवऱ्यांची जात आमुची कोण आम्हां भयभीत करी ।। ३ ।।

पोलादी निर्धार आमुचा असुर बलाची खंत नसे
स्वतंत्रतेच्या संग्रामाला विजयावाचुन अंत नसे
श्रद्धा हृदयातील आमच्या वज्राहुनि बलवंत असे
मरण मारूनी पुढे निघाले, गर्व तयांचा कोण हरी
रणनवऱ्यांची जात आमुची कोण आम्हां भयभीत करी ।।४।।

भरतभूमिचा वत्सल पालक देवमुनींचा पर्वत तो
रक्त दाबुनी उरात आम्हा आर्त स्वराने पुकारतो
हे सह्याचल, हे सातपुडा, शब्द अंतरा विदारतो
त्या रक्ताची या शब्दाची शपथ आमच्या जळे उरीं
रणनवऱ्यांची जात आमची कोण आम्हां भयभीत करी ॥

जंगल जाळापरी मराठा पर्वतश्रेष्ठा, उठला रे
वणव्याचा अडदांड गतीला अडसर आता कुठला रे
तळातळावर ठेचुन मारू हा गनिमांचा घाला रे
स्वतंत्रतेचें निशाण अमुचे अजिक्य राखू धरेवरीं
रणनवऱ्यांची जात आमची कोण आम्हा भयभीत करी ॥

– कुसुमाग्रज

# प्यारा हिन्दुस्थान

प्यारा हिन्दुस्थान माझा प्यारा हिन्दुस्थान
नव्या जगाच्या नव्या घडीचे एकच आशास्थान ॥ ध्रु० ॥

इथे हिमालय कीर्ती हिमासम
इथे नद्यांसह प्रीती रसागम
भव्य सागर नि जन पुरुषोत्तम
दिव्य प्रेममय त्यागी जनता येथिल सृष्टीसमान ॥ १ ॥

रक्तपिपासू न ही संस्कृती
वृकव्याघ्रासम नसे प्रकृती
मानव्याची मूर्त आकृती
सकळ जगाला मानवतेचे देई पाठ महान ॥ २ ॥

येथे अकबर, येथ शिवाजी
कबीर, तुलसी, एकनाथजी
बुद्ध, प्रबुद्ध नि शुद्ध गांधीजी
एकी, शांती, त्याग नि प्रीती यांची माणिक खाण ॥ ३ ॥

स्वातंत्र्यास्तव जवान उठती
प्राणपणाने रणात लढती
देशासाठी देह ठेविती
बलशाली परि करिल भारता हे त्यांचे बलिदान ॥ ४ ॥

परकियांच्या पाशामधुनी
विमुक्त झाली अपुली जननी
अम्हां कुणाची भीती भुवनी ?
भारतभूचे सुपूत्र गाती स्वातंत्र्याचे गान ॥ ५ ॥

– वसंत बापट

# शिंग फुंकले रणी

शिंग फुंकले रणी वाजतात चौघडे
सज्ज व्हा, उठा उठा सैन्य चालले पुढे ॥ध्रु०॥

दास्यकाल संपला शांत काय झोपला
अग्नि येथ कोपला पेटुनी नभा भिडे ॥ १ ॥

लोकमान्य केसरी गर्जतात वैखरी
माजला असे अरी चारू त्याजला खडे ॥ २ ॥

वीस सालचा लढा जाहला किती बडा
इंग्रजास बेरडा आणिले कसे रडे ॥ ३ ॥

तीस सालची प्रभा उज्ज्वला करी नभा
गांधी अग्रणी उभा ठाकला रणी पुढे ॥ ४ ॥

शीर घेऊनी करी दंग होऊ संगरी
घालवू चला अरी हिमालया पलीकडे ॥ ५ ॥

— वसंत बापट

# चला उगवतीकडे

स्वातंत्र्याचा सूर्य आपला लाल धुळीने बुडे
खुनशी घाला पडे, चला रे चला उगवतीकडे-- ॥ धृ० ॥
(लाल चीनचा पडला घाला, चला उगवतीकडे)

बंधुभाव दावून घातली उरी घातकी सुरी
जखम धरा दाबून, चला रे पुढे सरा संगरी
रणांगणावर रिपुरुधिराचे खुशाल घाला सडे ॥ १ ॥

नेफावर तोफांचा ताफा, लक्ष लाल संगिनी
भय कोणाला यांचे भिडतां जवान रणरंगणी
झुंजारांनो भुजा उभारा, विजयी झेंडा चढे ॥ २ ॥

स्वातंत्र्याची ज्योत भारती हृदयी हृदयी जळे
'मारू किंवा मरू' मंत्र हा मायदुधातुन मिळे
खडे राहिले रणांत हट्टी पहा पहाडी कडे ॥ ३ ॥

मुंग्यांच्या रांगांपरी आली चालून पिवळी दळे
कशी दडपता येतिल त्यांना रक्तांतिल वादळे
इथे मस्तके तुटली तरिही लढत राहती धडे ॥ ४ ॥

वीरांनो ! तुमच्यावर वरुनी देव फुले वाहती
नयनांतिल नीरांजन लावुन दिशा उभ्या राहती
झणण झडाया झाले आतुर विजयाचे चौघडे ॥ ५ ॥

– वसंत बापट

# शपथ

शपथ जवानांची
तरुण तुफानांची
शपथ तुम्हा, शपथ तुम्हा विजयनिशाणांची ॥ १ ॥

शपथ संगिनींची
रुधिर रंगिणींची
शपथ तुम्हा, शपथ तुम्हा शूर कृपाणांची ॥ २ ॥

शपथ हमीदाची
शपथ शहीदांची
शपथ तुम्हा, भारतीय वीर विमानांची ॥ ३ ॥

शपथ भारताची
शपथ भविष्याची
शपथ तुम्हां अंतरिच्या अढळ इमानाची ॥ ४ ॥

– वसंत बापट

# करा आनंदी आनंद

हर हर महादेव बोला
हाणा एक भीम टोला ॥ १ ॥

जय जय एकलिंग भगवान
पळवा बेइमान हैवान ॥ २ ॥

सत् श्री अकाल की जय हो
आम्हांला कोणाचे भय हो ? ॥ ३ ॥

पुकारा आयो गुरखाली
सेना विजयी ही झाली ॥ ४ ॥

बोला अल्ला हो अकबर
तिरंगा चढवा गगनावर ॥ ५ ॥

गर्जा गर्जा जय हिंद
करा आनंदी आनंद ॥ ६ ॥

– वसंत बापट

## जय स्वतंत्रता जय जनसत्ता

जय स्वतंत्रता जय जनसत्ता जय जय हिंदुस्थान
चले जाव दुस्मान, ना तरी दावु तुला अस्मान ॥ ध्रु. ॥

तोफेला तोफा भिडवू
विजयाचा डंका झडवू
हे निशाण गगनी चढवू
जा परतून गुमान, ना तरी, घालू कंठस्नान ॥ १ ॥

आता न दया ना माया
जर मौत हवी तर या या
ठाकलो तुम्हा गाडाया
या पुढती हैवान, या इथे, तुमचे कबरस्थान ॥ २ ॥

# उचल तुझी तलवार

उचल तुझी तलवार, जवाना देइ धडक बलवान
तू शौर्याची खाण सैनिका भरतभूमिची शान ।। ध्रु. ।।

पुत्र खरोखर तू क्रांतीचा
मित्र इमानी विश्वशांतीचा
मातृभूमिचे रक्षण करण्या रणांगणी दे प्राण ।। १ ।।

भेद वर्ण जातीचे मिटले
पक्ष पंथ हे बंधन तुटले
प्राणपणाने लढवू अवघे भारतवर्ष महान् ।। २ ।।

धारातीर्थी लढता लढता
शिरकमले भूमीवर पडता
बलिदानाच्या अभिमानाने उन्नत हो हिमवान् ।। ३ ।।

मारू किंवा मरू झगडता
वज्रनिश्चये रणात लढता
पिढ्यापिढ्यांना स्वातंत्र्याचे अमृतमय वरदान ।। ४ ।।

— सुमन्त वरणगावकर

## जयतु जयतु भरतभूमि

जयतु शौर्यशालिनी जयतु पुण्यदायिनी
जयतु जयतु जयतु जगति भरतभूमि मानिनी ।। ध्रु० ।।

सात गगनमंडळात नौबती निनादतात
समरसज्ज व्हा क्षणात दशदिशा बजावतात
जय स्वतंत्र लोकतंत्र वीरमंत्र गात गात
लाख वादळांसमान उतरती दळे रणात
साभिमान तळपतात, सांगतात संगिनी
जयतु जयतु जयतु जगति भरतभूमि मानिनी ।। १ ।।

रक्त जोवरी नसात त्राण जोवरी उरात
भावशक्ति मानसात प्राण देह पंजरात
मायभूमि रक्षणार्थ झुंज धुंद संगरात
या अशा उफाळतात लाख ऊर्मि अंतरात
धडकली पुरी बिनी भडकल्या कडा बिनी
जयतु जयतु जयतु जगति भरतभूमि मानिनी ।। २ ।।

— वसंत बापट

# झेंडा स्वर्गावर चढवा

धरा हासली गगन निवळले
उजळ दिशांतुन स्वच्छ हवा
जयजयकार करा मातेचा
झेंडा स्वर्गावर चढवा ॥ ध्रु. ॥

धन्य आमुची भारतमाई
पुत्र पाच तिज हिंदु-इसाई-
शीख-पारसिक-मुस्लिमभाई
निज रक्ताच्या पाच नद्यांचा
घडविति ते पंजाब नवा ॥ १ ।

गुलाब केशर कमल फुलांची
विपुल जलाची हरीत दलांची
काश्मीर भूमी अमुची अमुची
दहा दिशांतून अवकाशांतुन
भीष्म घोषणा दुमदुमवा ॥ २ ॥

या देशाच्या अभिमानाचा
विक्रमशाली पराक्रमाचा
शौर्य धैर्य दृढनिश्चय यांचा
कळवाया इतिहास भविष्या
रस रक्ताचा आज हवा ॥ ३ ।

– वसंत बापट

## बलिदान

हे व्यर्थ न हो बलिदान
बलाढ्य बनतिल अपंग दुर्बल
मृत सामर्थ्ये सजीव होतिल
उठतील हो क्रोधाने गर्जत
शतकांचे नादान ॥ १ ॥

बालमुठी वळतिल बाजेवर
थरथरतिल अस्थींचे पंजर
धुळीमधोनी फुलतील ज्वाला
धगधगतिल पाषाण ॥ २ ॥

घरांघरांतुनि पथापथावर
पवित्रतेचे पडे कलेवर
माणुसकीच्या मुड्यावरती
थयथयते हैवान ॥ ३ ॥

चितेवरी वीरांनो अपुली
जरी शरीरे नष्ट जाहली
झळकत येईल त्या अग्नीतुन
समराचेच निशाण ॥ ४ ॥

स्फुरेल यांतुन घोष उद्याचा
मायदेश हा जित्या जिवांचा
कोट्यवधी प्रेतांचे नाही
केवळ दहनस्थान ॥ ५ ॥

घेऊनिया ही थोर कहाणी
अमित काळच्या जलधीवरूनी
जातील या रक्तांच्या लाटा
आक्रोशत रणगान ॥ ६ ॥

## सिंहगर्जना

सिंहगर्जना होता अवघे जाय थरारून रान
वीरांच्या झुंजार घोषणा जिंकती रणमैदान || ध्रु. ||

रोहिडेश्वराच्या पुढती गर्जला जसा तो शिवबा
औरंगजेब दरबारी करि घोष वीर तानाजी
कापता कळस सोन्याचे संतप्त वदे संताजी
उत्तरेत संचरताना बोलला कितीदा बाजी
अन् पानपतावर पडता बेहोष म्हणे दत्ताजी
झांशीची राणी लक्ष्मी बोलली तेच संतापे
काल्पीवर कोसळताना जे वदले तात्या टोपे
'हर हर हर हर महादेव हो ठार करा दुष्मन'
वीरांच्या झुंजार घोषणा जिंकती रणमैदान || १ ||

गर्जला चितोडावरूनी तो रत्नसिंह रणगाजी
कापला भयाने तेव्हा तो अल्लाउद्दिन खिलजी
पृथ्वीराज चौहानाने गर्जून सोडला तीर
अन् हळदी घाटामध्ये गरजले प्रतापी वीर
'जय एकलिंग' हा नारा उठला जो मेवाडात
थरथरल्या मोगल सेना दिल्लीच्या मैदानात
गोविंदसिंह गुरु जेव्हा शीखांना दे तलवार
अन् तेजबहादुर बंदा वाऱ्यावर झाले स्वार
'सत श्री अकाल' या घोषाने दुमदुमले अस्मान
वीरांच्या झुंजार घोषणा जिंकती रणमैदान || २ ||

या साऱ्या रणघोषांची एकत्र जाहली शक्ती
नवजवान हृदयी आता भरलेली भारतभक्ती
हिमशिखरावरूनि येतो जयहिंद एक हा नारा
सीमेच्या गगनावरती विजयाचा एकच तारा
हे जवान भारतभूचे शीखमुस्लिम हिंदु-इसाई
सर्वांच्या हृदयी मंत्र जय जय रे भारतमाई
रावीच्या तीरावरती डौलात तिरंगा डोले
'जय हिंद' पुन्हा 'जय हिंद' 'जय हिंद' तीनदा बोले
जय जय भारत हे ललकारत लढती वीर जवान
वीरांच्या झुंजार घोषणा जिंकती रणमैदान ॥ ३ ॥

– वसंत बापट

# लाल चिन्यांनो खबरदार

लाल चिन्यांनो खबरदार खबरदार जर याल पुढे
ध्वजा तिरंगी नभी उडे जवान हिंदी इथे खडे ॥ध्रु०॥

प्राणप्रिय ही आमुची भूमी कणाकणांचे आम्ही स्वामी
निर्झर, डोंगर, सिंधु, सरोवर प्राणहि देऊ यांच्या कामी
शिरजोरांचे बळजोरांचे राई राई करू तुकडे ॥ १ ॥

आजवरी या भरतभूमिवर कितीक आले चेंगिझ नादिर
पाठविले साऱ्यांना बघण्या यमसदनाचे दार भयंकर
याच पुढे, मग कोटी करांनी दाबणार तुमचे नरडे ॥ २ ॥

मूर्खांनो का उगा डागता तुम्ही तोफांची सरबत्ती
कलिकाळाला ना डगमगली, मर्द मराठ्यांची छाती
मारू किंवा मरू आम्हाला इतिहासाने दिले धडे ॥ ३ ॥

देशासाठी तयार आम्ही मृत्यूला कवटाळाया
रणांगणी चालला मराठा घाव तुम्हावर घालाया
अम्ही उतरलो रणमैदानी गाडू तुमचे इथे मढे ॥ ४ ॥

किसान–मजुरा ! कसा कंबरा प्रसंग आला बाका हो
लाल चिन्यांनी मायभूमिवर आज घातला डाका हो
इथले त्यांचे हेर हेरुनी, चारा त्यांना धूळखडे ॥ ५ ॥

– शाहीर बाबा फोडके

# सैनिक माझे नाव

उभा पाठिशी सदैव माझ्या, तेजोमय इतिहास
उभे पाठिशी प्रताप, शिवबा, उभे शौर्य विश्वास
उभे पाठिशी भगतसिंगजी, उभे गुरू गोविंद
उभा पाठिशी सुभाष योद्धा, गर्जतसे जयहिंद

या देशाचा मी संरक्षक
भारत माझे गाव
सैनिक माझे नाव

मी न मराठी राजस्थानी, धर्म जाती मज हिंदुस्थानी
मायभूमीचा मी अभिमानी, या अभिमानी धर्मव्रताचा
अवघा अंतर्भाव... सैनिक माझे नाव ॥ १ ॥

जननी माझी भारतमाता, या भूमीतच पिके वीरता
जन्म मृत्यू ती मला न चिंता, देह विनाशी हा तर केवळ
आत्म्याचा पेहराव... सैनिक माझे नाव ॥ २ ॥

जितेन आणि जगेन लोकी, रण क्रीडांगण माझ्या लेखी
खड्ग पडो की मुकुट मस्तकी, देशकार्य ते देवकार्य मज
अढळ अंतरी भाव... सैनिक माझे नाव ॥ ३ ॥

उरी निर्भयता नयनी अग्नि, उन्नत मस्तक करी शारधनी !
उभा इथे मी असा निशिदिनी, बघू कोणता शत्रु करतो
कुठून धीट उठाव... सैनिक माझे नाव ॥ ४ ॥

— ग. दि. माडगुळकर

# जिंकू किंवा मरू

माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध आमचे सुरू
जिंकू किंवा मरू ॥ ध्रु. ॥
लढती सैनिक, लढू नागरिक
लढतील महिला, लढतील बालक
शर्थ लढ्याची करू ॥ १ ॥
देश आमुचा शिवराजाचा
झांशीवाल्या रणराणीचा
शिर तळहाती धरू ॥ २ ॥
शस्त्रास्त्रांना शस्त्रच उत्तर
भुई न देऊ एक तसूभर
मरू पुन्हा अवतरू... ॥ ३ ॥
हानी होवो कितीहि भयंकर
पिढ्यापिढ्या हे चालो संगर
अंती विजयी ठरू ॥ ४ ॥

– ग. दि. माडगूळकर

# लढा वीर हो लढा लढा

लढा वीर हो लढा लढा
पराक्रमाने अधिक उंचवा हिमालयाचा कडा ॥ ध्रु० ॥

शेजाऱ्यांचे शूर शिपाई
सीमारेषा पुसुनी पायी
लुटू पाहती तुमची आई
त्या ढोंग्यांच्या मुसक्या बांधा, भ्याडा हाती भरा चुडा ॥ १ ॥

काल विलगले भाऊ म्हणुनी
आज शांतिला दुर्बल गणुनी
काढू पाहती मूळच खणुनी
तोडा त्यांचे हात अडाणी, कबंध तुडवित चढा चढा ॥ २ ॥

कपटासंगे शौर्य भांडु द्या
तसूतसूवर रक्त सांडु द्या
आक्रमकांचा श्वास कोंडु द्या
तुमच्या तोंडी विजयश्रीचा, सूर लागु द्या खडा खडा ॥ ३ ॥

रणमर्दांनो, तुमच्या पाठी
मारीत मारीत मरण्यासाठी
उभा भारतीय चाळीस कोटी
हटवा मागे पिशाच्च पिवळे, उडु द्या तोफा धडा धडा ॥ ४ ॥

– ग. दि. माडगूळकर

# भारत सेना विजयी असो

भारत सेना विजयी असो
या भूमीच्या स्वातंत्र्याला आक्रमणाचा धाक नसो ॥ ध्रु. ॥
या बुद्धाच्या भूमीवरती
अखंड नांदो समर्थ शांती
ज्ञानी निर्भय करो साधना, किसान आपुले शेत कसो ॥ १ ॥
शतदळकमळापरी भारती
एका देठी अनेक जाती
प्रत्येकाच्या मनी मानसी लोकशाहीचा मान वसो ॥ २ ॥
ठरो अयोध्या नगरी नगरी
अजिक्य गावे, डोंगर डगरी
क्षात्रतेज या जिवंत देशी, विजेसारखे नित्य रसरसो ! ॥ ३ ॥
वैनतेय हे चाळिस कोटी
सुधा शोधतिल मातेसाठी
भयाण कोणी उडता अजगर, नखाग्रास ना तिच्या डसो ! ! ॥ ४ ॥

– ग. दि. माडगूळकर

# जय रणचंडी, जयजय भारत

चौदा भाषा उठल्या गर्जत, जय मृत्युंजय, जय हिमपर्वत
जय रणचंडी जयजय भारत, जय भारत, जय हिंद ॥

उत्तर सीमेवरती वैरी फैरीमागुन झाडी फैरी
जळले आमुचे देह तरीही हात राहतील अस्त्रें वर्षंत ॥

जवान हिंदी तरणेताठे हिंदु, मुस्लिम, शीख, मराठे
घराघरांतुन उठले योद्धे, परंपरागत शौर्या परजित ॥

भेद संपले, सरल्या जाती, ऐक्य ठाकलें उभ्या भारतीं
द्रव्यसंपदा आणि अन्नदा रणचंडीच्या आता अंकित ॥

एक ध्येय हे एकच शिक्षण स्वातंत्र्याचें अभेद्य रक्षण
शिवेत पडतां पाय शत्रुचा त्याच क्षणीं तो जळेल निश्चित ॥

— ग. दि. माडगूळकर

# मराठ्यांचे संचलन गीत

बळ शत्रुचे जोखा
पाऊल पुढती टाका ॥ ध्रु. ॥

दूर राहिला मुलुख मराठी, दूर राहिले गाव
हिंदभूमीचा उमदा सैनिक हेच शरीरा नाव
एकच रस्ता लाखां ?
पाऊल पुढती टाका ॥ १ ॥

दूर राहिली मुले लेकरे, दूर राहिली माय
मायेमध्ये गुंतु नका रे, नका विसावु पाय
एक राहु द्या टेका,
पाऊल पुढती टाका ॥ २ ॥

विसरा आता निंब बाभळी, विसरा हिरवे माड
बाळपणाच्या वेशीवरचे उंच वडाचे झाड
मंत्र लढयाचा घोका,
पाऊल पुढती टाका ॥ ३ ॥

सुगीसराई विसरा, विसरा लिंबुर हुरडा गोड
बहादुरांनो, आज लागली, मरणासंगे होड
रणी यमाला जिंका,
पाऊल पुढती टाका ॥ ४ ॥

'जय भारत' हा एक राहु द्या ओठावरती बोल
देशासाठी आज द्यायचे सर्वस्वाचे मोल
शिंग वाजते ऐका,
पाऊल पुढती टाका ॥ ५ ॥

— ग. दि. माडगूळकर

## आवाहन

बर्फाचे तट पेटुनि उठले सदन शिवाचे कोसळते
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते ।। धृ. ।।

असुरांचे पद भ्रष्ट लागुनि आज सतीचे पुण्य मळे
अशा घडीला कोण करंटा तटस्थतेने दूर खळे
कृतान्त ज्वाला त्वेषाची ना कोणाच्या हृदयात जळे
सामर्मत्र तो सरे, रणाची नौबत आता धडधडते
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते ।। १ ।।

सह्यगिरीतील वनराजांनो या कुहरांतुनि आज पुढे
रक्त हवे जर स्वतंत्रतेला रक्ताचे पडतील सडे
एक हिमाचल राखायास्तव करा हिमाचल लक्ष खडे
समरपुराचे वारकरी हो समरदेवता बोलविते
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते ।। २ ।।

खडक काजळी घोटुनि तुमचे मनगट बाहू घडलेले
कडेकपारीमधील वणवे उरांत तुमच्या दडलेले
काबूल कंदाहार पथावर डंके तुमचे झडलेले
शिवतेजाची दीपमाळ पाठीशी आपुल्या पाजळते
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते ।। ३ ।।

कोटी कोटी असतील शरीरे मनगट अमुचे एक असे
कोटी कोटी देहांत आजला एक मनीषा जागतसे
पिवळे जहरी सर्प ठेचणे, अन्य मना व्यवधान नसे
एक प्रतिज्ञा, विजय मिळेतो राहिल रण हे धगधगते
रक्त आपुल्या प्रिय आईचे शुभ्र हिमावर ओघळते ।। ४ ।।

– कुसुमाग्रज

# उठो इन्सान

दुनिया बनायेंगे उठो इन्सान
इन्सानियतका कुछ धरो अभिमान ॥ ध्रु० ॥

इन्साफ करो इन्सान उठो जो भूखें है ।
ये कहकर हमने रास्ता आधा काटा है ।
झंडा उठाओ भाई अब तुम रुकना मत ।
सुख दूर है दुख केवल अबतक बाँटा है ।
अब लक्ष्य पर संधान ॥ १ ॥

हम डर के मारे चुप न कभी बैठे पलभर ।
हां, हम न डरे थे लाठी गोली फाँसी से ।
कब होगीं अपनी अपने दिलपर पूरी जय ।
क्यों आज डरे हम अपने अंतरवासी से ।
आगे बढो बलवान ॥ २ ॥

क्रांती करेंगे हम हमारा नारा है ।
शान्ती न छोडेंगे कभी ये दीक्षा है ।
हम साम्य युगे के सब युगंधर सैनिक है ।
फिर भी हमें तो गांधीजी की शिक्षा है ।
वरना विफल वरदान ॥ ३ ॥

अब दूर नहीं है क्रांती जनता राजकी ।
जनताके नेता जयप्रकाशजी कहते है ।
ऐ नवयुवकों तुम जाग उठो आगे बढ़ो ।
वो खोवे खो जो डरसे पीछे रहता है ।
गाये चलो जयगान ॥ ४ ॥

२३१५ काव्य
२९८३५


## दीप तू जलाता चल

हर तरफ अँधेरा है, दीप तू जलाता चल
रास्ते चमक उठे रोशनी लुटाता चल ॥ ध्रु० ॥
खून से शहीदोंने देश ये सँवारा है
क्रांती को वढाना है फर्ज ये हमारा है
देश जब पुकारे तो शीश तू चढाता चल ॥ १ ॥
जीत है उसी की जो हार से न घबराए
जिंदगी वही है जो मौत से न डरजाए
प्राण रख हथेली पर जिंदगी सजाता चल ॥ २ ॥
आज तू अकेला है, थक न जाए तेरा दिल
मुष्किले न मिट पायी दूर है अभी मंझिल
दूरियाँ न घबरा दें, दूरियां मिटाता चल ॥ ३ ॥

## जागा धरती का भगवान

जागा धरती का भगवान, जागा धरती का भगवान
अब न चलेगा राज तुम्हारा भागो रे शैतान ॥ ध्रु० ॥
हल और बैलों की जोडी ले पाल रहा जग सारा
इस की मेहनतसे भागेगा दुखियों का अँधियारा
इसके सरपर आसमान है तले खेत हरिहान ॥ १ ॥
जयप्रकाश के आंदोलनसे नया जागरण आया
दिशा दिशा में बजी दुंदुभी नया सवेरा लाया
भारतीय जनको मिला है नवयुग का आव्हान ॥ २ ॥
भुल जा रे यह बात पुरानी अब न चलेगी चाल रे
भारतवासी जाग उठे हैं हमे पुकारे काल रे
ना मिटा सकेगा आज हमको अब कोई हैवान ॥ ३ ॥

## गलत मत कदम उठाओ

गलत मत कदम उठाओ, सोचकर चलो, विचार कर चलो।
राह की मुसीबतों से प्यार कर चलो ।

तुम पे जिम्मेदारियाँ मुल्क की पड़ी ।
तुम न बदलो चाल अपनी अब घड़ी-घड़ी

तुम पे आनेवाले आस की नजर पड़ी ।
चिराग ले चलो, आग ले चलो;
मस्तियोंमें रंग भरे फाग ले चलो ॥

रहो होशियार हमेशा, न तुम डरो
दरिया, आसमान, पहाड़ो को सर करो

ज़हान की तरक्कियों के वास्ते मरो ।
आवाज करेगा, साज करेगा
तुम्हारी वीरता पे जहाँ नाज करेगा ।

दूर किनारे रहे, न मिले या शिखर,
मंजिल के मुसाफिर, तुझे क्या राह की फिकर

चट्टान तु, तुफान के झोंको का क्या जिकर
अंधेरा जा रहा, दिन है कि आ रहा,
वो कौन मंजिलोंपे उठा रहा ॥

जिन्दगी बेकार मरना इल्जाम हैं ।
काम में लगे रहो, यही आराम हैं ।

नहीं तो पानी भी यहाँ पीना हराम है।
बुझो न बात में, हो ध्येय साथ में।
गिरे को उठाने की हो ताकत भी हाथ में॥

काल की करवाल से इन्सान कब डरा,
तू प्रलय के बादलों को छेड़ तो जरा,
लाख मौत हो मगर मनुष्य कब मरा।
ज्योति जो जला, पंथ जो चला,
प्रेम का पला, भला वो सूर्य कब ढ़ला॥

# युग की जड़ता के खिलाफ

युग की जड़ता के खिलाफ एक इन्कलाब है ।
हिन्द के जवानों का एक सुनहरा ख्वाब है ।
भारतीय सांस्कृतिक क्रांती, मानवीय सांस्कृतिक क्रांती ॥

व्योम में हमारी पहुँच बढ़ रही है आज, पर
दूर हो रहा है घर पड़ोसी का
आदमी को आदमी के करीब लायेगी,
भारतीय सांस्कृतिक क्रांती, मानवीय सांस्कृतिक क्रांती ॥

आदमी भविष्य में यंत्र का न हो गुलाम,
मानवी गुण बढेंगे काम से ।
ऐसे योग-मुक्त काम हर जगह चलाएगी ।
भारतीय सांस्कृतिक क्रांती, मानवीय सांस्कृतिक क्रांती ॥

लेके हाथ हल-कुदाल और ज्ञान की मशाल,
आओ चले साथ साथ गाँव को ।
क्योंकि गाँव-गाँव से दीनता मिटाएगी
भारतीय सांस्कृतिक क्रांती, मानवीय सांस्कृतिक क्रांती ॥

# क्रांती है पुकारती

क्रांती है पुकारती तू सो रहा जवान है ।
क्रांती की तू आन और क्रांती की तू शान है ।।

देश में है त्राहि-त्राहि, सुन रहा है तू पड़ा ।
दीन की कराह-आह, सुन रहा है तू पड़ा ।
गाँव-गाँव भय-अशान्ती उठ रहा तुफान है ।।

कौन है जो दौड़-दौड़ गाँव-गाँव जायेगा ।
रक्त-क्रांती के वहम से देश को बचायेगा
तेरे बल पे अब भी देख, देश को गुमान है ।।

करवटे बदल नहीं, तू अब तो आँख खोल दे ।
तू निकल औ एक बार, इन्कलाब बोल दे ।।
तेरे दमसे यह जमीन और आसमान है ।

छोड़ दे ये भेदभाव, तोड़ दे ये रूढियाँ
रूढियोंसे बँध सकी हैं, कब नवीन पीढियाँ
सब मनुज समान और सबका हक समान हैं ।

तू बढ़ा है जब कभी तो, आँधियाँ लजा गई
क्रांतियाँ कदम-कदम पे मंजिले सजा गई
तेरे इक सही कदम पे झुक गया जहाज हैं ।

मार्ग की मुसीबतों से, कब रुकी जवानियाँ ।
युग चुनौतियों के डर से, कब झुकी जवानियाँ ।।
उठ कदम बढ़ा कि तेरी साँस मे तफान है ।।१।।

# क्रांति के सिपाही चले

शांति के सिपाही चले, क्रांति के सिपाही चले ।
लेके खैरख्वाही चले, रोकने तबाही चले ।।

वैर–भाव तोडने, दिल को दिल से जोडने
काम को सँवारने, जान अपनी वारने ।। रोकने० ।।

विश्व के ये पासबाँ, लेके सेवा का निशां
भीरुता से सावधान, चल पडे हैं बेगुमाँ ।। रोकने० ।।

सत्य की संभाल ढाल, अहिंसा की ले मशाल
धरती माँ के नौनिहाल, है निकल पडे सुचाल ।। रोकने० ।।

'जय जगत्' पुकारते बढ़ रहे बिना रुके
लेके दिलके वळवले, अपने ध्येय को चलो ।। रोकने० ।।

# जाग उठी तरुणाई है।

जयप्रकाश का बिगुल बजा तो जाग उठी तरुणाई है।
तिलक लगाने तुम्हें जवानो क्रांति द्वार पर आई हैं॥ ध्रु. ॥
कौन चलेगा आज देश से भ्रष्टाचार मिटाने को,
बर्बरता से लोहा लेने सत्ता से टकराने को
आज देख ले कौन रचाता मौत के संग सगाई हैं ॥

पर्वत की दीवार कभी क्या रोक सकी तुफानों को,
क्या बंदूकें रोक सकेंगी बढ़ते हुए दुष्ट जवानों को
चूर चूर हो गयी शक्ति वह जो हमसे टकराई है ॥

सावधान पद या पैसे से होना है गुमराह नहीं
सीनेपर गोली खाकर भी निकले मुखसे आह नहीं
ऐसे वीर शहीदों ने ही देश की लाज बचाई है ॥

लाख लाख झोपडियों में तो छाई हुई उदासी है
सत्ता संपत्ती के बंगलो मैं हसती पूरणमासी है
यह सब अब ना चलने देगे हमने कसमे खायी है ॥

आओ कृषक, श्रमिक, नागरिको, इन्कलाब का नारा दो
गुरुजन, शिक्षक, बुद्धिजीवियो अनुभवभरा सहारा दो
फिर देखे हम सत्ता कितनी बर्बर है ! बौराई हैं ॥

# करवटें बदल रहा है आज सब जहाँ

करवटें ऽऽ; करवटें बदल रहा है, करवटें ऽऽ
करवटें बदल रहा है आज सब जहाँ, आज सब जहाँ ।। ध्रु. ।।
करवटें बदल रहा है आज सब जहाँ, आज सब जहाँ

रंग बदलते जा रहा है धरति आसमाँ, धरति आसमाँ ।। करवटे...
क्यों न हम कदम बढ़ा सके समय के साथ
क्यों न छेडें हम बदलते जिंदगीके तार
नौजवान ! करवटें बदल रहा है, नौजवान ।। करवटें ... ।। १ ।।

अब न रोकेसे रुकेंगे जिंदगी राह
अब नहीं रुकेंगे जहाँ, रुकति है निगाह
हम मिलेंगे और मिलेंगे कंधे और कदम, मिलेंगे कंधे और कदम
एक हो निशान अपना एक ही निशाँ ।। करवटें ··· ।। २ ।।

## मानव तितुका

" मानव तितुका एकच आहे;
नीच न कोणी, उच्च न कोणी "
हाच आपुला धर्म खरोखर
हीच आपुलि " शाश्वत वाणी " ॥ १ ॥

स्वतंत्रतेने मानव राहो
असोत राष्ट्रे स्वतंत्र सारी
पृथ्वीची तर सर्व लेकरे
कोण धनी अन् कोण भिकारी ? ॥ २ ॥

या तरुणांनो, वेद जपा हा
जपा जपा हे दिव्य कुराण
हाच अवेस्ता वाचा सारे
वाचा हेची ख्रिस्त पुराण ॥ ३ ॥

पददलितांना उचलुनि घ्यारे
प्रेमालिंगन द्या दीनांस
पशुत्व सोडुनि मानव व्हा रे
नवधर्माचा घ्या रे ध्यास ॥ ४ ॥

उन्मत्तांना नमवायाते
खुशाल बांधा ना कमरा
कलह न करिता एकजुटीने
लढुनिया जिंकू समरा ॥ ५ ॥

आज जगातील धर्मांना या
अधर्मपण जणु का आले ?
परस्परातील भांडण केवळ
स्वधर्म वैभव का झाले ॥ ६ ॥

राष्ट्र–धर्म हा नाही आपुला
मानव धर्म न हा जाणा
" एकी, शांती, त्याग " असे हा
नवधर्माचा नवबाणा ॥ ७ ॥

या धर्माचे दूत होऊनी
फिरा फिरा मग विश्वात
सेवा समता संघटनेची
द्वाही फिरवा जगतात ॥ ८ ॥

REFBK-0021835
REFBK-0021835
2375 काव्य
29134